**मे. सरोज फार्मा इंडस्ट्रीज इंडीया प्रा. लि. गट नं. ५६/२ आणि ५७, हरसुले ता. सिन्नर जि. नाशिक- ४२२ १०३ यांच्या प्रस्तावित API आणि इंटरमीडिण्ट उत्पादन प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्तांत :**

..........................................................................................................................................

मे. सरोज फार्मा इंडस्ट्रीज इंडीया प्रा. लि. गट नं. ५६/२ आणि ५७, हरसुले ता. सिन्नर जि. नाशिक- ४२२ १०३ यांच्या प्रस्तावित API आणि इंटरमीडिण्ट उत्पादनासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. उप-विभागिय अधिकारी, सिन्नर , ता. सिन्नर ,जि. नाशिक- यांचे अध्यक्षतेखाली दि. ०८ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता पार पडली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं. ई - ४९ / २०२३ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २३०७१३ – एफटीएस– ०१११ दि. १३/०७/२०२३ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) मा.जिल्हाधिकारी, नाशिक किंवा<br>त्यांचे प्रतिनिधी अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी /<br>उप विभागिय दंडाधिकारी | - अध्यक्ष |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक<br>(सदस्य सचिव म.प्र.नि.मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी) | - सदस्य |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>नाशिक | - संयोजक |

श्री. अमर दुर्गुळे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक तथा संयोजक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. संयोजक यांनी सदर पर्यावरण विषयक सुनावणी बाबतचे महत्व तसेच याबाबत केलेल्या कार्यप्रणालीची माहिती दिली.

संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री.अमर दुर्गुळे, संयोजक यांनी असे सांगितले की म.प्र.नि. मंडळास प्रकल्प प्रवर्तक मे. सरोज फार्मा इंडस्ट्रीज इंडीया प्रा. लि. गट नं. ५६/२ आणि ५७, हरसुले ता. सिन्नर जि. नाशिक- ४२२ १०३ यांच्या प्रस्तावित API आणि इंटरमीडिण्ट उत्पादनासाठी प्रकल्प उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीसाठी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदर अर्जाच्या अनुशंगाने मा. जिल्हाधिकारी नाशिक यांनी सदरची सुनावणी दि. ०८.०८.२०२३ रोजी मा. उप-विभागिय अधिकारी , सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली घेण्याबाबत निर्देशित केले.

त्याअनुशंगाने सदर वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. अनुषंगाने उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ नाशिक यांनी स्थानिक वृतपत्र मराठी दैनिक " सकाळ " व दैनिक " टाइम्स ऑफ इंडीया" या इंग्रजी यात दिनांक ०७.०७.२०२३ रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पा विषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ – नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, मा. जिल्हाधिकारी कार्यालय- नाशिक, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, नाशिक, उप विभागीय अधिकारी, सिन्नर, जिल्हा-नाशिक, तहसील कार्यालय, सिन्नर, ग्रामपंचायत कार्यालय, खापरळे, वडगाव, मोहदरी, पांढुर्ली, सोनंबे, चिंचोली ता. सिन्नर, जि. नाशिक व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेले होते.

उप-प्रादेशिक अधिकारी तथा संयोजक, यांनी सांगितले यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. सदरहू सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित पर्यावरण व वातावरणीय मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल.

मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी सदर सुनावणी सुरु करणेस परवानगी दिली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार मे. सडेकर एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा. लि.यांचे प्रतिनिधी यांनी प्रकल्पाबद्दल विविध मुदयांवर सादरीकरण केले. जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदय:स्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

सदर सुनावणी दरम्यान खालीलप्रमाणे मुददे उपस्थित करण्यात आले.

| अ.क्रं | टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी | उद्योगाच्या प्रतिनिधीने दिलेले उत्तर |
|---|---|---|
| १. | संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नाशिक विचारले की, सांडपाण्यावर काय प्रक्रिया सयंत्रना उभारणार आहात? | उद्योगाचे तांत्रीक सल्लागार यांनी उद्योगातुन निर्माण होणारे सांडपाणी हे कमी टि.डी.एस. व जास्त टि.डी.एस. असे वर्गीकरण करुन वेगळे केले जाईल. जास्त टि.डी.एस. असलेले सांडपाणी हे मल्टीपल इफेक्ट इव्हापोरेटर सिस्टीम व ए.टी.एफ.डी मध्ये प्रक्रिया केले जाईल तर कमी टि.डी.एस. असेलेले सांडपाणी हे ई.टी.पी. आर. ओ. मध्ये प्रक्रिया केले जाईल. घरगुती सांडपाण्यावर एस.टी.पी. मध्ये प्रक्रिया केली जाईल. त्यामुळे प्रकल्पातुन निर्माण होण्याऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते पुन:श्च उद्योगामध्ये वापर करण्यात येईल व कोणतेही सांडपाणी हे उद्योगाच्या बाहेर सोडले जाणार नाही. |
| | प्रकल्पाच्या आजूबाजूच्या परिसरात केलेल्या अभ्यासाचे तपशील तुम्ही दाखवले आहेत. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर वातावरणातील हवेवर किती % परिणाम होणार आहे? | उद्योगाचे तांत्रीक सल्लागार यांनी सांगीतले, आम्ही प्रकल्पाच्या आजूबाजूच्या ८ गावांचा अभ्यास केला आहे आणि हवेच्या गुणवत्तेचे निकाल विहित मर्यादेत आहेत. उद्योग सुरु झाल्यनंतर हवेच्या गुणवत्तेवर कोणताही परिणाम होणार नाही. बॅग फिल्टर आणि पुरेशा उंचीचे स्टॅक प्रदान करणार आहोत. प्रक्रिया उत्सर्जन नियंत्रित करण्यासाठी स्क्रबर्स प्रदान केले जातील. |

| | | |
|---|---|---|
| २. | श्री.रामचंद्र शिंदे, गाव हरसुळे- तुम्ही नमूद केल्याप्रमाणे सांडपाणी सोडले जाणार नाही. परंतु, प्रकल्पाच्या बांधकामाच्या वेळी आपण प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारली पाहिजे जेणेकरुन जवळपासच्या शेतकऱ्यांच्या शेतात सांडपाणी विसर्ग होणार नाही. | उद्योगाचे प्रतिनिधी यांनी प्रदूषण नियंत्रण यंत्रणेचे काम बांधकामाच्या वेळी केले जाणार असल्याची माहिती दिली.<br><br>संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नाशिक सांगितले- प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविल्यानंतर व पडताळणी केल्यानंतर उद्योग चालविण्याची परवानगी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिली जाते. |
| ३ | श्री. प्रकाश शिंदे, हरसुळे -मालेगाव एमआयडीसीमध्ये रोजगार दिला जात नाही. स्थानिक लोकांचा रोजगारासाठी विचार केला जाईल का?. | उद्योगाचे प्रतिनिधी यांनी स्थानिकांना उद्योगामध्ये नोकरीसाठी प्राधान्य देण्यात येईल. अकुशल कामगार हे स्थानिक क्षेत्रातील घेण्यात येईल तर कुशल कामगार हे स्थानिक पातळीवर उपलब्ध न झाल्यास बाहेरुन घेतले जातील. |

जनसुनावणीच्या अध्यक्षांनी माहिती दिली की प्रकल्प प्रस्तावकांच्या तांत्रिक प्रतिनिधीने विविध पर्यावरणीय मुद्दांवर सादरीकरणासह थोडक्यात माहिती दिली आहे जसे की पर्यावरण प्रभाव मूल्यांकन, प्रकल्पाबद्दल तपशील, प्रकल्प आराखडा, पर्यावरणाची स्थिती, स्थानिक पर्यावरण आणि आसपासच्या पर्यावरणाचा तपशील, माहिती, अभ्यास क्षेत्राची ठिकाणे, अभ्यास क्षेत्रातील हवेची गुणवत्ता, अभ्यास क्षेत्रातील आवाजाची पातळी, अभ्यास क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, तसेच प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक यंत्रणा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले असून स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगार दिला जाईल. यापुढे कोणताही प्रश्न आणि सूचना नसल्याने उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांनी सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| ( अमर दुर्गुळे )<br>संयोजक तथा उप्राअ<br>मप्रनि मं. नाशिक | ( डॉ.रा.आ.राजपुत )<br>सदस्य तथा प्रा.अ.<br>मप्रनि मं. नाशिक | (श्रीमती. हेमांगी पाटील)<br>अध्यक्ष तथा<br>मा. उप-विभागिय दंडाधिकारी,<br>तथा सहाय्यक जिल्हाधिकारी,<br>सिन्नर |